# जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस

P.R.O. Office, Crime Branch, Pune City

**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001

**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police


**प्रेसनोट क्रमांक - १०२७ दिनांक २८/०६/२०२०**

## बंडगार्डन पोलीसांनी मोबाईल व्हॉट्सअप वरती मटका घेणा-या इसमास केली अटक

दि.२५/०६/२०२० रोजी १७/०० वा. सुमारास बंडगार्डन पोलीस स्टेशन अंकीत ताडीवाला चौकीचे प्रभारी अधिकारी,सहा पोलीस निरीक्षक अमोल काळे, पो ना ३३९० जगताप पो शि १०११७ सावंत,पो शि ८३६७ घोडेकर असे ताडीवाला पोलीस चौकीचे हाद्दीत पायी पेट्रोलींग करीत असताना श्री. अमोल काळे यांना त्यांचे गुप्त बातमीदार मार्फत बातमी मिळाली की, नवचैतन्य मित्रमंडळाजवळ १३ ताडीवाला रोड पुणे येथे एक इसम मोबाईल फोनव्दारे व्हॉट्अप वरती मटका घेत असल्याची अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने सदरची बातमी मा.वरीष्ठ पोलीस निरीक्षक, बंडगार्डन पोलीस स्टेशन पुणे शहर यांना सांगितली असता त्यांनी सदर बातमीची शहानिशा करुन कायदेशीर कारवाई करणे बाबत मुखजल आदेश दिल्याने सदर ठिकाणी पंचांसमक्ष एकाच वेळी १८/३० वा. छापा घातला असता छाप्या दरम्यान मोबाईवरुन व्हॉट्रसअप वरती अवैध्यरित्या मटका घेत असणा-या इसमास ताब्यात घेतले असून त्याचे नाव व पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव प्रितम उत्तरेश्वर गांधले,वय ३५ वर्ष धंदा व्यवसाय रा नवचैतन्य मित्र मंडळाजवळ १३ ताडीवाला रोड पुणे असे असल्याचे सांगितले त्यास सदर मटका कोणाकरीता घेत आहे व त्यास त्याच्या मालकाचे नाव विचारले असता त्याने अतुल देवकर असे सांगितले त्यास ताब्यात घेऊन पंचांसमक्ष अंगझडती घेतली असता त्यांचे ताब्यात व त्याचे समोर एकुण १२,००० रुपये किंमतीचा मुद्देमाल (पैसे व जुगारीचे साहित्याचे)मिळुन आले.सदर इसमावरीती बंडगार्डन पो स्टे पुणे येथे गु.र.नं-२२३/२०२० महाराष्ट्र जुगार बंदी अधिनियम कलम १२(अ) गुन्हा नोंद केला असुन त्यांचा पुढील तपास ताडीवाला रोड पोलीस चौक्‍ीचे प्रभारी अधिकारी अमोल काळे हे करीत आहे.

सदरची चांगली कामगिरी वपोनि.श्री.श्रीकांत शिंदे व पोनि.(गुन्हे),श्री दिगंबर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि अमोल काळे पो ना ६४९९ लाड, पो ना ३३९० जगताप, पो शि १०११७ सावंत,पो शि ८३६७ घोडेकर यांनी केली आहे.